# अखेर बरसलाच, शेती पिकांना फटका

## कोठे सकाळी, तर कोठे सायंकाळी पावसाचे आगमन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.27 ) -** हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार शुक्रवारी (दि.27) जिल्ह्यात अनेक भागात जोरदार पाऊस बरसला. मात्र या पावसाने कोठे सकाळी तर कोठे सायंकाळी हजेरी लावल्याने अनेकांची दाणादाण झाली. हा पाऊस काही शेती पिकांना लाभदायक तर काही पिकांकरिता धोकादायक ठरताना दिसत आहे.

शुक्रवारी सकाळी 11 वाजता अचलपूर, परतवाडा, अंजनगाव सुर्जी या भागात पावसाने हजेरी लावली. सायंकाळी मात्र उघाड दिली. त्या उलट सायंकाळी 6.30 वाजताच्या सुमारास अमरावती शहरात पावसाने नागरिकांची दाणादाण उडवली. हवामान तज्ज्ञांनी पावसाचा अंदाज दिला होता. त्यानुसार अमरावती शहरात 15 मिनिट पावसाचे आगमन झाले, त्यानंतर वातावरणात गारवा कायम होता.

27 डिसेंबर रोजी सकाळपासूनच ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पाऊस पडणार असा अंदाज होता. परंतू दिवसभर ढगाळ वातावरणात पावसाचा थेंबही पडला नाही आणि अचानक सायंकाळी पाऊस पडल्यामुळे जनजिवन विस्कळीत झाले होते. हिवाळ्याच्या हंगामात पावसाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. या पावसाने काही भागात रब्बी पिकाच्या पेरणीवर परिणाम केला आहे. जिल्ह्यातील अचलपूर, परतवाडा, चिखलदरा, चांदुर रेल्वे, धामणगाव, नांदगाव खंडेश्वर, भातकुली तालुक्यांसह इतर भागात या पावसाने शुक्रवारी हजेरी लावली. वातावरणात अचानक होणाऱ्या बदलामुळे शेतकरी आधीच त्रस्त आहेत.

यापूर्वीच अत्याधिक थंडीमुळे तुरीवर दव पडल्याने नुकसान झाले होते. आता पुन्हा या अवकाळी पावसाने शेती पिकांचे नुकसान केले आहे. सध्या जिल्ह्यात रब्बी हंगामात मका, ज्वारी,गहू,हरभरा,कांदा, मोहरी तसेच भाजीपाला पीकांची लागवड करण्यात आली आहे. आतापर्यंत 1 लाख 41 हजार 401 हेक्टरवर पेरणी आटोपली आहे. यंदाही सर्वात जास्त हरभराचा पेरा शेतकऱ्यांनी केला आहे. 98 हजार 95 हेक्टरवर पेरणी हरभऱ्याची झाली आहे. तर त्या खालोखाल 36 हजार 210 हेक्टर वर गव्हाची पेरणी करण्यात आली आहे.

### 29 नंतर वाढणार थंडी

दक्षिण पश्चिम बंगालच्या उपसागरात आंध्र –तामिळनाडु किनारपट्टीवर असलेल्या चक्राकार वाऱ्याच्या प्रभावामुळे विदर्भात अंशतः ढगाळ वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे किमान तापमानात 2 ते 4 अशांने वाढ झालेली आहे.सक्रिय पश्चिमी विक्षोभ पश्चिम हिमालयावर हवेच्या मधल्या आणि खालच्या थरात कार्यरत आहे.त्यामुळे राजस्थान वर चक्राकार वारे निर्माण झाले आहे. वरील दोन्ही हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे मध्य भारतात अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातुन बाष्पयुक्त वारे येण्याची शक्यता आहे. परिणामी विदर्भात या कालावधीत विखुरलेल्या स्वरुपात हलक्या मध्यम पावसाची शक्यता आहे. 29 तारखेपासून वातावरण मोकळे होण्याची शक्यता आहे. त्यानंतरच थंडीचे पुनरागमन होईल.

**प्रा.अनिल बंड, हवामान अभ्यासक,**
**श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती.**

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या भेटीला आले होते डॉ. मनमोहन सिंग

## 70 हजार कोटींची कर्जमाफी प्रा.वीरेंद्र जगताप यांनी दिला आठवणींना उजाळा




**रवि कलाने**

**चांदुर रेल्वे, ( दि. 27 ) -** 2006 साली प्रभाताई राव राज्याच्या काँग्रेस अध्यक्षा असताना महाराष्ट्रातील व त्यातल्या त्यात विदर्भातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या काँग्रेसचा आमदार या नात्याने आपण तत्कालीन पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांच्याकडे मांडल्या होत्या त्यावरून त्यांनी धामणगाव मतदार संघातील धामणगाव येथे स्वतः भेट देऊन शेतकऱ्यांच्या विधवांचे दुःख जाणून घेतले होते आणि त्यानंतर शेतकरी पॅकेज ची घोषणा केली होती, काल डॉ मनमोहनसिंग यांचे निधन झाले त्या प्रसंगी मनमोहन सिंग यांच्या आठवणीला उजाळा देतांना माजी आमदार प्रा वीरेंद्र जगताप यांनी वरील माहिती दिली.

प्रसिद्ध अर्थतज्ञ सोबतच शेतकऱ्यांच्या गरिबीची जाण असणारा महान नेता आज आमच्यातून हरविल्याचे त्यांनी म्हटले, 2006 मध्ये माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग धामणगाव रेल्वे येथून परत गेले त्यानंतर 3 हजार 750 कोटींचे पॅकेज घोषित केले होते, घोषित झालेल्या पॅकेज मुळे धामणगाव मतदार संघाला 7 मोठे जलसिंचन प्रकल्प मिळाले त्यात सोनगाव शिवणी, रायगड प्रकल्प, चांदीनंदी प्रकल्प, टीमटाला प्रकल्प,निम्न साखळी प्रकल्प, चांदसुरा प्रकल्प, गणेशपुर प्रकल्प यांचा त्यात समावेश आहे. त्यानंतर 2 वर्षात म्हणजेच 2008 साली 70 हजार कोटींची शेतकरी कर्जमाफी सुद्धा डॉ मनमोहन सिंग सरकारनेच शेतकऱ्यांना दिली असल्याच्या आठवणी प्रा वीरेंद्र जगताप यांनी व्यक्त केल्या.

# दोन सावकरांच्या घराची झाडाझडती

## काही दस्तावेजही जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.27 )-** जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या पथकाने अचलपूरमध्ये दोन सावकरांच्या घरी धाड टाकून झाडाझडती घेतली. त्यांच्या घरातून काही आक्षेपार्ह दस्तावेजही ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई शुक्रवारी (दि.27) करण्यात आली. जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या आदेशाने अचलपुर शहरात दोन ठिकाणी अवैध सावकारीच्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन पथकाने दोन ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. पथक क्रं 1 मध्ये सहायक निबंधक दर्यापुर पथक प्रमुख के.एस.बलिंगे, ढोके, गडलिंग, सपकाळ, हांडे याचा समावेश होता. या पथकाने कांडली परिसरातील रश्मी नगर राजकुमार गुळधे यांच्या राहते घरी धाड टाकली. यावेळी गुडधे यांच्या घरातून काही करारनामे, कोरे चेक व इतर असे 13 दस्त जप्त करण्यात आले. तसेच पथक क्रं.2 मध्ये सहायक निबंधक, वरुड ए.डी.चर्जन, मुळे, अरबट, कुकडे व दहातोडे यांच्या समावेश होता. या पथकाने जुना सराफा येथील रमेश गुलाबचंद तांबी यांच्या राहते घरी धाड टाकली. येथे कोरे धनादेश, करारनामे व इतर असे 33 दस्त जप्त करण्यात आले. सदर धाडीसाठी स.नि.अचलपुर पी.एन. गुल्हाणे, मुख्य लिपीक पी.बी.मोरे यांनी प्राप्त तक्रारीवरुन नियोजन केले होते. यामध्ये अचलपूर पोलीस पथकाचीही मदत घेण्यात आली.

# 69 बालकांना निघाला हृदयविकार


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.27 ) -** अमरावती जिल्ह्यात एप्रिलपासून ते नोव्हेंबर या आठ महिन्यांत शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिरांमध्ये 69 बालकांना हृदयविकाराचा त्रास असल्याचे आढळून आले.

तपासणीदरम्यान हृदयाला छिद्र आढळून आल्याने या बालकांना वेळीच शस्त्रक्रिया करून जीवन आधार देण्यात आला. तसेच जन्मजात विकृती व इतर आजार असलेल्या 402 बालकांवर करण्यात येत असलेल्या विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने दिली. राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत, अंगणवाडी, शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर मुलांची विविध तपासणी केली जात आहे. त्यासाठी शिबिरे घेण्यात येत आहेत त्यात काही मुले जन्मजात एएसडी, व्हिएसडी आणि पीडीए हे हृदयाशी संबंधित आजार आहेत. या आजारात फुफ्फुसातून जास्त प्रमाणात रक्त वाहील्यामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, दम लागणे, थकवा जाणवणे, वजन न वाढणे आदी समस्या दिसून येतात. दरम्यान, राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत 1 ते 18 वर्षे वयोगटातील मुलांसाठी विविध गंभीर आजारांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येत आहे. यावेळी सीएस डॉ. दिलीप सौंदळे यांनी 8 महिन्यांत 69 मुलांवर 402 मुलांवर हृदयविकाराच्या इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या असल्याची माहिती दिली.

# अखेर भातकुली रेल्वे क्रॉसिंगवर पर्यायी मार्गाचे काम सुरू

## रेल रोको आंदोलनाची प्रशासनाने घेतली दखल



अंडर पास चे काम रेल्वे क्रॉसिंग जवळ सुरू असताना मागील दीड महिन्यापासून हा मार्ग बंद असल्याने अनेक गावाचा संपर्क अमरावती शहरापासून तुटलेला होता. त्यामुळे नागरिकांना समस्यांचा सामना करावा लागतो. अत्यावस्थ रुग्णांना वेळेवर उपचारही मिळत नव्हते. रुग्णवाहिका देखील लवकर पोहोचत नव्हत्या. आरोग्य सेवेवर मार्ग बंद असल्यामुळे सर्वाधिक परिणाम झाला होता. या ठिकाणी पोलिसांची पेट्रोलिंग देखील बंद झाल्यामुळे चोरीच्या घटना देखील वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे होते.


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.27 )-** पर्यायी मार्ग नसल्याने भातकुली रेल्वे क्रॉसिंगवर नागरिकांनी बुधवारी आंदोलन केले होते. तब्बल दीड तास या मार्गावरील रेल्वे रोखून धरण्यात आल्या होत्या. अखेर या आंदोलनाची दखल प्रशासनाने घेतली असून नागरिकांसाठी पर्यायी मार्ग तयार करण्याचे कार्य सुरू केले आहे.

मागील दीड महिन्यापासून भातकुली रेल्वे क्रॉसिंग वरील अंडर बायपासचे काम सुरू होते. येथे मोठा खड्डा खोदून ठेवला होता. मात्र काम पुढे सरकत नव्हते. त्यामुळे नागरिक चांगलेच आक्रमक झाले होते. दरम्यान नागरिकांना लांबचा फेरा घेऊन जावे लागत असल्याने अशातच हृदयविकाराच्या झटक्याने एका रुग्णाचा रुग्णवाहिकेतच मृत्यू झाल्यामुळे नागरिकांचा रोष चांगलाच उफाळून आला होता. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने आताकुठे स्थानिक नागरिकांसाठी पर्यायी मार्गाचे काम सुरू केले आहे. आंदोलनानंतर राजकीय पदाधिकाऱ्यांनी रेल्वे विभागाच्या डीआरएम पांडे यांना योग्य कार्यवाही करण्याचे सांगितले होते. त्यामुळे नागरिकांचा रोष पाहता अखेर पर्यायी मार्ग तयार करण्यात येत आहे.

# मेळघाट मधील दुर्लक्षित गवळी समाज

## उन, वारा, पावसातही हेटी ची भटकंती



**मारोती पाटणकर**

**चुरणी -** मेळघाट मध्ये गवळी समाज मोठ्या प्रमाणात असून अनेक समस्यांनी ग्रस्त आहेत. आर्थिक सामजिक, राजकीय, दृष्ट्या अतिशय मागासलेला आहे. दिवाळी झाल्यावर हेटी घेऊन आपल्या कुटुंब व गुरांसह परप्रांतात पलायन करतात. आणि थंडीचा कहर वाढल्याने गवळी कुटुंब व गुरांना थंडीचा प्रचंड त्रास होत आहे. बिऱ्हाडावर आंथरून व पांघरून कमी असल्याने अतिशय त्रास होत आहे. तसेच गुरे उघड्यावर असल्याने गुरांना थंडीमुळे अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. दुध कमी होते.

मेळघाट मध्ये मोठ्या प्रमाणात गवळी समाज असून गुरे चारने व दुग्ध व्यवसाय करणे हा मुख्य व्यवसाय आहे. दुध असून त्यावर प्रक्रिया करून मोठे उद्योग नसल्याने मातीमोल दराने दुधाची विक्री करावी लागते. मेळघाट मधील चारापाणी संपल्यावर गवळी बांधव आपल्या कुटुंबासह बैलबंडी मध्ये बिऱ्हाड व आपल्या गाई, म्हशी घेऊन चारापाण्याच्या शोधात पोटाची खडगी भरण्यासाठी गावापासून कोसोदुर परप्रांतात निघून जातात. सोबत लहान मुलेही असतात. त्यांच्या शिक्षणाचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे लहान बालक लसीकरण व शिक्षणापासून वंचित राहतात. शैक्षणिकदृष्ट्या हा समाज खुप मागासलेला आहे. या समाजाचे बोटावर मोजण्याइतके लोक शासकिय नोकरी व व्यवसायात आहेत.

### महाभारत काळापासून वास्तव्य

महाभारत काळापासून गवळी समाज मेळघाट मध्ये वास्तव्यास असल्याची माहिती मिळते. स्थानिक पातळीवर शासकिय सेवेत आरक्षण नाही. म्हणून शासनाकडे आरक्षणासाठी वेळोवळी मागणी केली जात आहे. हेटी घेऊन गेल्यावर उलंगवाडी झालेल्या शेतात उघड्यावर आपला संसार थाटून चारा असे पर्यंत त्या शेतात त्यांचा मुक्काम असतो. नंतर पुन्हा बिऱ्हाड उचलून दुसऱ्या शेतात जातात. असे उन्हाळा संपेपर्यंत त्यांचा नित्यनेम असतो.

### श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ आशेचा किरण


व्याघ्र प्रकल्पाचे जटील वनकायदे मुळे जंगलात गुरे चांरण्यावर प्रतिबंध आहे. चुकून गुरे सापडले तर कठोर कारवाई करत गुरांचा लिलाव केला जातो. तसेच मालकावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले जाते. या करीता उपाययोजना म्हणूनं शासनाने चारा डेपो सुरू करून बंदिस्त गुरे पालन करण्याची प्रोत्साहन पर योजना राबवणे गरजेचे आहे. तसेच विधानसभा निवडणुकीपूर्वी गवळी समाजासाठी श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ ची घोषणा केली होती. या महामंडळ मार्फत नियोजन करून अनेक योजना राबवून या समाजाचा विकास करणे गरजेचे आहे. अशी मागणी ही मेळघाट मध्ये जोर धरत आहे. या सरकारकडे आशेचे किरण म्हणून मेळघाट मधील गवळी समाज पाहत आहे.

### एका दिवसात तीस कि.मी.चा पायदळ प्रवास

दरम्यान आठवड्यातील एकच दिवस सोमवारी व्याघ्र प्रकल्पातून तीस कि.मी चा प्रवास करावा लागतो, कारण त्यांना हा प्रवास एकाच दिवसात पूर्ण करावा लागतो. तीस कि.मी उपाशी गुरांना पायी हाकत नेताना रस्त्यातच्या कडेने चारा गवत खाऊ देता येतं नाही. जर चुकून गुरांनी व्याघ्रप्रकल्प क्षेत्रातील चारापाणी खाल्ले तर त्यांच्यावर वनविभागाकडून कारवाई होते. हेटीवर प्रचंड थंडी वारा पाणी, चक्री वादळ असहय्य होणारा उन्हाळा, विजेचा कडकडाट या सर्व नैसर्गिक आपत्तीचा सामना गवळी कुटुंब व गुरांना करावा लागतो. आता जास्तच थंडी असल्याने पारा 10 च्या आत आला आहे. त्यामूळे दुभते जनावर आजारी पडत आहेत. या नैसर्गिक आपत्तीत बरेचदा गुरांचा मृत्यू देखील होतो. दुभती गाय, म्हैस यामधे मृत्यू झाल्यावर कुटुंबाचा आर्थिक स्त्रोत बंद होतो. त्यानंतर पुन्हा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. अश्या अनेक समस्याचां सामना करावा लागतो.म्हणून शासनाने गांभीर्याने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# वाहनांना नवीन नंबर प्लेट बसविण्याकरिता 31 मार्चपर्यंत मुदत

## प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवाहन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.27 ) -** केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार राज्य शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसविण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार वाहनधारकांनी 31 मार्च पूर्वी नंबर प्लेट बसवावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

जिल्ह्यासाठी एजंसी निश्चित करण्यात आली आहे. एचएसआरपी नंबर प्लेटसाठी बुकींग करण्यासाठी mhh-srp.com पोर्टल निश्चित करण्यात आले आहे. वाहनधारकांनी पोर्टलवर बुकींग करून त्यांच्या सोईप्रमाणे अपॉइंटमेंट घेऊन एचएसआरपी नंबर प्लेट दि. 31 मार्च 2025 पूर्वी बसवून घेण्यात यावी. वाहनधारक अमरावती कार्यालयातील नोंदणीधारक नसला तरी अमरावतीमध्ये वाहन वापरत असल्यास वाहनास एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे.

एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी दुचाकी, ट्रॅक्टरसाठी 450 रूपये, तीनचाकीसाठी 500 रूपये, इतर सर्व वाहनांसाठी 745 रूपयांप्रमाणे जीएसटी वगळून शुल्क आकारण्यात येणार आहे. वाहनधारकांना त्यांच्या वाहनावर एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याबाबत तक्रारी असल्यास संबंधित सेवापुरवठा धारकांच्या पोर्टल, तसेच अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयात तक्रार दाखल करू शकतील.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे, तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे आवश्यक आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील वाहनधारकांनी वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्या वाहनावर एचएसआरपी नंबर प्लेट बसविली नसल्यास वाहनाचे मालकी हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा चढविणे, उतरविणे, दुय्यम प्रत, विमा अद्यावत करणे आदी कामकाज थांबविण्यात येणार आहे. एचएसआरपी नंबर प्लेट नसलेली वाहने, बनावट एचएसआरपी नंबर प्लेट असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी कळविले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४



# श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा मुख्य कार्यक्रम रद्द

## भाऊसाहेबांना आदरांजली आणि डॉ.मनमोहनसिंग यांना वाहिली श्रद्धांजली

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.27 )** – भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या निधनामुळे श्री शिवाजी शिक्षण संस्थेने शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या 126 व्या जयंतीचा मुख्य सोहळा रद्द करून स्मृती भवन येथील डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण केले व आदरांजली वाहिली आणि त्याच परिसरात शोकसभा घेऊन माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या 126 व्या जयंतीचा मुख्य सोहळा आज सकाळी नऊ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर केंद्रीय मंत्री ना.नितीनजी गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात ना.गडकरी यांना 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार होते सोबतच विदर्भातील दोन उत्कृष्ट शेतकरी महिलांना या सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार होते परंतु काल रात्री माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या निधनामुळे राष्ट्रीय शोक जाहीर झाल्याने संस्थेने आजचा मुख्य कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला.

आज सकाळी 8 वाजता डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती स्थळावरील भाऊसाहेबांच्या



पूर्णाकृती पुतळ्याला संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष अ‍ॅड.गजाननराव पुंडकर, अ‍ॅड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे, प्रा.सुभाषराव बनसोड.सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ.पुरुषोत्तम वायाळ, डॉ.अमोल महल्ले आणि उपस्थितांनी पुष्पचक्र वाहून आदरांजली अर्पण केली. माजी मंत्री वसुधा देशमुख, आमदार सुलभा खोडके, राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके यांनीही स्मृतिस्थळ येथे भेट देऊन भाऊसाहेबांना आदरांजली अर्पण केली.

त्या नंतर याच परिसरात संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत श्रद्धांजली सभा घेण्यात येऊन दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांना दोन मिनिटे मौन पळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या सभेला संस्थेतील सर्व अधिकारी, कर्मचारी, संस्थेचे आजीव सदस्य, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काळगव्हाण ते कारला मार्गाची दयनीय अवस्था

## आमदार लवटेंना नागरिकांचे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.27 )**– काळगव्हाण ते कारला मार्गावर मोठ्या प्रमाणात जागोजागी खड्डे पडले आहे. या मार्गाची दयनीय अवस्था झाल्यामुळे रस्ता लवकरात लवकर दुरुस्त व्हावा याकरिता दर्यापूर अंजनगाव सुर्जी मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार गजानन लवटे यांना नागरिकांनी निवेदन दिले.

अंजनगाव सुर्जी तालुक्याचे शेवटचे टोक म्हणून ओळखले जाणारे गाव काळगव्हाण असून या गावाला जाण्याकरिता अंजनगाव सुर्जी ते आकोट मार्गावरील कारला येथून मार्ग असून या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठी कसरत करत मार्ग काढावा लागतो. कित्येक दिवसापासून मार्गाची कुठली दुरुस्ती न



झाल्यामुळे दिवसेंदिवस या मार्गावर रस्ता कमी व खड्डेच जास्त झाल्याने त्रस्त नागरिकांनी नवनिर्वाचित आमदार गजानन लवटे यांच्या कडून रस्ता व्हावा अशी आशा आहे. निवेदन देताना मोहम्मद जावेद, श्याम गीते, शेख कलीम, नाना तायडे यांच्यासह इतरही नागरिक उपस्थित होते.

# माहेश्वरी कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.27 )**– स्थानिक अमरावती येथील गणेशदास राठी छात्रालय समिती द्वारा संचालित श्री प्रेम किशोर सिकची विद्यालय व माहेश्वरी कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनात विविध स्पर्धेत भाग घेतला तसेच विद्यार्थ्यांच्या अविष्काराने सर्वांची मने जिंकली.

या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष वसंतकुमार मालपाणी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) प्रिया देशमुख तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव डॉ.गोविंद लाहोटी, शाळा समिती सदस्य डॉ.मुरलीधर बुब व वीरेंद्र लड्ढा हे उपस्थित होते. याप्रसंगी उद्घाटन यांनी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये घेतलेल्या सहभागाचा व कला गुणांचे कौतुक केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे विद्यार्थी परिमल वानखडे व जयेश चाकोले यांनी केले. तर आभार प्रदर्शन विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सीमा व्यास यांनी केले. स्नेहसंमेलना निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभ च्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य ओमप्रकाश लड्डा तर प्रमुख उपस्थिती म्हणून डीसीपी कल्पना बारवकर, उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर, तर विशेष उपस्थिती म्हणून संस्थेचे सदस्य शामसुंदर दमानी, प्रदीप सिकची, शाळा समिती सदस्य राजेंद्र बुच्चा, आभा लाहोटी हे उपस्थित होते. स्नेहसंमेलन निमित्त आयोजित स्पर्धांमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविला अशा विद्यार्थ्यांना याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य राजेश पवार यांनी केले. तर सूत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी नंदिनी आवारे व विद्यालयाची विद्यार्थिनी सावरी दामोधरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन मेघा कापसे यांनी केले.

# भक्तीमय वातावरणात पार पडला श्री रामगीर महाराज पुण्यतिथी महोत्सव

## काल्याचे किर्तन, महाप्रसाद व भव्य यात्रा महोत्सवात हजारो भाविक-भक्तांची उपस्थिती





**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.27 )** – येथे श्री समर्थ रामगीर महाराज यांचा 236 व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त यात्रा महोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला असुन गेल्या सात दिवसांपासून नित्यनेमाने दिवसभरातील विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये दरवर्षी प्रमाणे कमलीचा उत्साह भाविक भक्तांमध्ये बघायला मिळाला.

पुण्यतिथी महोत्सव दि.17 ते 24 डिसेंबर पासून चाललेल्या या सप्ताहात चालणाऱ्या या कार्यक्रमामध्ये दररोज सामुदायिक प्रार्थना, श्रीमत् भागवत कथा, भजने, हरिपाठ,

### ग्रंथ शोभायात्रा व पालखी मिरवणूक

दि.23 डिसेंबर 2024 रोजी रामगीर महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात भागवत कथा सप्ताहाची सांगत करण्यात आली. त्यानंतर ग्रंथाची पालखी मिरवणूक व समर्थांच्या पालखीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली.याप्रसंगी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन %उद्धवराव चौधरी (वाईवाले) यांच्या तर्फे करण्यात आले. महाराजांच्या शोभायात्रेच्या स्वागतासाठी गाव परिसरातील सर्व नागरिक घरासमोरील संपुर्ण परिसर स्वच्छ करून, पाणी शिंपुन तसेच रंगरांगोळ्या घालून सुशोभित करण्यात आले होते. अंजनगाव परिसराला दिवाळी चे स्वरूप आले होते. पालखीचे नेतृत्व मठाधिपती प्रसन्नगीर गुरू कैलासगीर महाराज केले. या यात्रेचा भागवत प्रवचनकार, किर्तनकार, गावातील प्रतिष्ठित मंडळी व कार्यकर्त्यांचा सहभाग नोंदविला होता.

काकडा आरती असे विविध धार्मिक कार्यक्रम रोज नित्यनेमाने पार पडले. उर्वरित वेळेत परिसरातील भजनमंडळीनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. दि.24 डिसेंबर 2024 ला सकाळी 10 ते 2 किर्तनकार ह.भ.प. धनश्याम महाराज तायवाडे (मु.पो.अंदोरी, जि.अमरावती) यांच्या सुमधूर वाणीतून गोपालकाल्याचे किर्तन पार पडले. त्यानंतर %भव्य महाप्रसादा%चे आयोजन करण्यात आले. याचा सर्व भाविक-भक्तांनी तसेच आजुबाजुच्या गावातील नागरिकांनी लाभ घेतला. यामध्ये गावातील युवक, तरूण व देवस्थानच्या सेवाधाऱ्यांनी आपले अमुल्य योगदान दिले तसेच गावातील सर्व दुर्गोउत्सव मंडळे, गणेशोत्सव मंडळे, पाकवाद्य निर्मात्यांनी आपली उपस्थिती दर्शविली तसेच सेवा दिली. यात्रा महोत्सवाचा लाभ परिसरातील हजारो भाविकांनी घेतला असल्याचे मठाधिपती प्रसन्नगीर महाराज यांनी सांगितले.



# कुरळपूर्णा येथे सीसीआय अंतर्गत कापूस खरेदीला सुरुवात

## शेतकऱ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.27 )**– तालुक्यातील टोगलापुर फाटा, मासोद (कुरळ पुर्णा) येथील ज्ञानेशकन्या अ‍ॅग्रो प्रोडयुसर कंपनी द्वारा संचालित विठ्ठल जिनींग अँड प्रेसींग येथे सी.सी.आय खरेदी सुरू सुरू झाली आहे .या खरेदी मुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत असून पैसे 7 दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असल्याचे संचालकांनी सांगितले आहे. शेतकऱ्यांना कापूस आणताना डिजिटल सात बारा ज्यावर कापूस पिकपेरा नोंदणी असावा, तसेच येथे एकरी 12 क्विंटल कापूस खरेदी होईल, ज्याचा सात बारा आहे त्याच शेतकऱ्याचे आधारकार्ड मोबाइल नंबर लिंक असावे, शेतकरी स्वतः हजर असावे, येथे कापसाला 7471 रुपये भाव मिळत आहे. जिनिंग शनिवार व रविवार बंद राहिल. त्यामुळे या दोन दिवशी कापूस खरेदी केली जाणार नाही, अशी माहितीसुध्दा संचालकांनी दिली.

# मोर्शी-वरुड विधानसभा मतदारसंघात मोठे प्रकल्प आणून रोजगाराची निर्मिती व्हावी!

## नवनिर्वाचीत आमदारांकडून तरुण पिढीला अपेक्षा

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.27 )** – बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मोर्शी - वरूड मतदार संघात नवीन व मोठे प्रकल्प आणणे गरजेचे आहे. या प्रकल्पाद्वारे मतदार संघातील सुशिक्षित गरजू युवकांना नोकरीची संधी उपलब्ध व्हावी. अशी अपेक्षा नवनिर्वाचित आमदार चंदू यावलकर यांच्याकडे मतदारसंघातील तरुण पिढी व्यक्त करित आहेत.

मागील अडीच वर्षात महाराष्ट्रात सत्तांतर झाले आणि एकापाठोपाठ एक मोठे प्रकल्प बाहेरच्या राज्यात केले. हे प्रकल्प राज्याबाहेर का गेले? या संदर्भात एकमेकांवर कुरघोडी सुरू आहे, परंतु या प्रकल्पाचे नियोजन केले असते तर कदाचित महाराष्ट्रातून हे प्रकल्प गेले नसते. राज्यातील तसेच



वरुड-मोर्शी मतदार संघातील तरुण वर्ग नोकरीच्या शोधात आहेत. विशेषत: मुंबईकडे तरुणांचा कल आहे. हातात रोजगार नसल्यामुळे तरुण वर्ग प्रचंड निराश आहे. महाराष्ट्राने जवळपास 1 कोटी 80 लाख रुपयांची गुंतवणूक असलेले चार मोठे प्रकल्प गमावले आहेत. हे प्रकल्प गेल्यामुळे राज्याने या प्रकल्पामधून येणाऱ्या एक लाखाहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करण्याची संधी गमावली आहे. या प्रकल्पामध्ये अलीकडे स्थानांतर झालेली 22 हजार कोटींचा टाटा एअरबस, सी 295 ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट मॅन्युफॅक्चरिंग प्लांट, नागपूर येथील मिहानमध्ये स्थापित होईल अशी अपेक्षा होती. या प्रकल्पामुळे सुमारे 6000 रोजगार निर्माण करण्याची संधी गेली आहे. यापूर्वी वेदांता, फॉक्सकॉन, बल्क ड्रग पार्क, मेडिकल डिव्हाईस पार्क हे महत्त्वाचे प्रकल्प राज्याबाहेर गेले आहेत. नागपूरमधील मिहान चांगले ठिकाण ठरू शकले असते जेणेकरून या मतदार संघातील तरुणांना रोजगाराची संधी त्या ठिकाणी मिळू शकली असती, असे या क्षेत्रातील तज्ञांचे मत आहे.

### आमदार घेणार का दखल?

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत राज्यातील जनतेने भाजपा प्रणित महायुतीला पुन्हा एकदा भरभरून मते दिली असून बहुमताने सरकार स्थापन करण्यासाठी सहकार्य केले आहे. आज भाजपाचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडवणीस हे विदर्भातील आहे आणि आमदार यावलकर यांचे चांगले संबंध आहे याचा फायदा घेऊन यावलकर यांनी वरुड-मोर्शी विधानसभेमध्ये नवीन मोठे प्रकल्प तयार करून मतदार संघातील तरुणांना नोकऱ्या द्याव्या अशी मागणी मतदारसंघातील तरुणांनी आमदार चंदू यावलकर यांच्याकडून केली आहे. आता आमदार यावलकरव या प्रकरणाची दखल घेऊन त्यांच्या कार्यकाळात नवीन प्रकल्प उभे करणार का असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.

# हिवाळी अधिवेशनात 20 वर्षानंतर दोन दिग्गज आमदारांच्या आवाजाची उणीव

### सत्ताधारी आमदारांचा प्रभाव कमी?

**मोहम्मद अजहरुद्दीन**
**अचलपूर,( दि.27 )** – नागपूर येथील हिवाळी अधिवेशन हे महाराष्ट्रातील महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा आणि वादविवादाचे केंद्र असते. यंदाही अधिवेशनात अनेक मुद्दे मांडले गेले, मात्र यावेळी अमरावती जिल्ह्यातील दोन दिग्गज नेते, बच्चू कडू आणि यशोमती ठाकुर, यांच्या आवाजाची उणीव जाणवली.

गेल्या 20 वर्षांपासून अचलपूरचे आमदार बच्चू कडू आणि तिवसाच्या आमदार यशोमती ठाकुर यांनी आपल्या भागातील प्रश्न प्रखरतेने विधानसभेत मांडले. बच्चू कडू, जे प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आहेत, त्यांनी नेहमी शेतकरी, बेरोजगारी आणि



शिक्षणासंबंधी मुद्द्यांवर भर दिला. तर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकुर यांनी महिला सुरक्षा, ग्रामीण विकास आणि जनकल्याण योजनांना नेहमी अग्रक्रम दिला. अलीकडेच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये या दोन्ही नेत्यांचा पराभव झाला. विरोधकांच्या भूमिकेत असलेल्या दोन्ही दिग्गजांची उणीव जाणविल्याने अनेक महत्वाच्या मुद्दयाचीही उणीव यावेळी जिल्हावासियांना जाणविली. शेतकऱ्यांच्या



अडचणी, पाण्याची टंचाई, बेरोजगारी आणि नागरी सुविधांच्या अभावासारखे प्रश्न यंदाच्या अधिवेशनात अपेक्षित परिणामकारकतेने चर्चिले गेले नाहीत. बच्चू कडू आणि यशोमती ठाकुर यांनी त्यांच्या कार्यकाळात अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण आणि शहरी भागांतील अनेक समस्यांवर काम केले होते, मात्र त्यांच्या पराभवामुळे या भागांना नेतृत्वाच्या अभावाची झळ बसली आहे. अचलपूर आणि तिवसाच्या जनतेच्या मते, या दोन नेत्यांच्या पराभवामुळे या भागातील होवू घातलेले विकासकामे कासव गतीने सुरू आहेत. आधी या भागातील प्रश्न विधानसभेत प्राधान्याने मांडले जात, मात्र सत्ताधारी आमदार असल्याने यावेळी या मतदारसंघांच्या प्रश्नांवर आवाज उचलणारे कुणीच नव्हते.

अचलपूर आणि तिवसा सारख्या भागांमधील प्रश्न विधानसभेत गाजवणाऱ्या दिग्गजांच्या गैरहजेरीमुळे संपूर्ण जिल्ह्याला फटका बसला आहे. आता नवीन प्रतिनिधींनी जबाबदारी घेऊन या भागातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अचलपूर आणि तिवसा भागांमध्ये, जोपर्यंत प्रभावी नेतृत्व दिसत नाही, तोपर्यंत विकासाचा वेग कमी राहणार असल्याचे दिसत आहे.